माहिती हवीय?

संदीप खोपडे, धनकवडी.

□ **मा. विनायक यांनी कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केल्या? त्यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांची नावे सांगा.**

— *अयोध्येचा राजा*(हिंदी *अयोध्या का राजा*), *अग्निकंकण*(हिंदी जलती निशानी), *माया मच्छिंद्र*(हिंदी-मराठी), *सैरंध्री*(हिंदी-मराठी), *सिंहगड*(फक्त मराठी), *विलासी ईश्वर*(हिंदी *निगाहें, नफरत*), *छाया*(हिंदी-मराठी), *धर्मवीर*(हिंदी-मराठी), *प्रेमवीर*(हिंदी-मराठी), *ब्रह्मचारी*(हिंदी-मराठी), *ज्वाला*(हिंदी-मराठी), *ब्रँडी की बोतल, देवता*(फक्त मराठी), *अर्धांगी*(हिंदीत *घर की राणी*), *लपंडाव*(फक्त मराठी), *अमृत*(हिंदी-मराठी), *संगम*(हिंदी-मराठी), *चिमुकला संसार*(फक्त मराठी), *माझं बाळ*(फक्त मराठी), *डॉ. कोटणीस की अमर कहानी, मंदीर* या चित्रपटात मा. विनायकनी भूमिका केल्या. *विलासी ईश्वर*(*निगाहें, नफरत*), *छाया, धर्मवीर, प्रेमवीर, ब्रह्मचारी, ज्वाला, ब्रॅण्डीची बाटली, देवता, अर्धांगी*(*घर की राणी*), *अमृत, सरकारी पाहुणे, माझं बाळ, बडी माँ, जीवनयात्रा, सुभद्रा, मंदीर* हे त्यांनी दिग्दर्शित केलेले चित्रपट. या चित्रपटांपैकी *मंदीर* त्यांचा शेवटचा चित्रपट. तो अपूर्ण असतानाच त्यांचं निधन झालं. त्यांच्या मृत्यूनंतर दिनकर द. पाटील यांनी हा चित्रपट पूर्ण केला.

अ. वा. कोर्टीकर, पंढरपूर.

□ **१८५७च्या स्वातंत्र्य संग्रामावर आधारित एखादा हिंदी चित्रपट तयार झाला होता का? असेल तर या चित्रपटाचे निर्माता, दिग्दर्शक व कलाकार कोण?**

— १९४६ला १८५७च्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या पार्श्वभूमीवरील एक चित्रपट तयार झाला होता. या चित्रपटाचं नाव होतं १९५७. मोहन सिन्हा या चित्रपटाचे निर्माता-दिग्दर्शक होते. प्रमुख कलाकार सुरेंद्र, सुरैया, वास्ती, निगार सुलताना, लक्ष्मी गंजू, मुन्शी खंजर, लीला, मेनका.

रविकांत साखरे, कुंभारतळे.

□ **अमिताभने तरुण नायकाची भूमिका करणं बंद केल्यावर चरित्र भूमिका केलेले चित्रपट कोणते? नायिका व दिग्दर्शक कोण?**

— *इन्सानियत*(नायिका जयाप्रदा, दिग्दर्शक टॉनी), *मृत्युदाता*(नायिका डिंपल, दिग्दर्शक मेहुलकुमार), *बडे मिया छोटे मिया*(नायिका रमैया, दिग्दर्शक टिनू आनंद), *मोहब्बतें*(नायिका नव्हती, दिग्दर्शक आदित्य चोप्रा), *कभी खुशी कभी गम*(नायिका जया बच्चन, दिग्दर्शक करण जोहर), *आँखे*(नायिका नाही. दिग्दर्शक विपुल शहा), *सूर्यवंशम्*(नायिका सौंदर्या, दिग्दर्शक टी. प्रकाशराव)

□ **माया बॅनर्जीने भूमिका केलेले चित्रपट कोणकोणते? नायक कोण?**

— *जागीरदार*(मोतीलाल), *महागीत*(सुरेंद्र), *कोकिला* (मोतीलाल), *डायनामेट* (सुरेंद्र), *हम तुम और वो*(मोतीलाल), *कॉम्रेड* (सुरेंद्र), *जोकरमन*(कुमार), *भोले भाले*(प्रेम अदीब), *सर्व्हिस लिमिटेड*(सुरेंद्र), *लक्ष्मी*(लक्ष्मी), *उस की तमन्ना*(याकूब), *अनुराधा*(त्रिलोक कपूर), *मधुसूदन*(कुमार), *चुडीयाँ*(प्रेम अदीव), *प्रीतम*(श्यामसुंदर), *दावत*(जयंत), *पराया धन* (बलवंत सिंह), *स्कूल मास्टर*(करण दीवाण), *कालेजायन*(बलवंत सिंह), *दोस्त*(मोतीलाल), *लेडी डॉक्टर*(बी. नांद्रेकर), *अमिरी*(बारुआ), *अपना घर*(चंद्रमोहन), *आवाज*(वास्ती), *रत्नावली*(सुरेंद्र), *वीर कुणाल*(किशोर साहू), *पहचाना*(बरुआ), *झरना*(अमन), *नदिया के पार*(सुशील साहू), *निशान*(रंजन) या चित्रपटात माया बॅनर्जीने भूमिका केल्या. या सर्व चित्रपटांत ती नायिका नव्हती. नायिकेबरोबर सहनायिका व खलनायिका या भूमिकादेखील तिने केल्या.

संदीप खोपडे, धनकवडी.

□ **तब्बूचा पहिला चित्रपट कोणता? तिला आतापर्यंत कोणकोणत्या चित्रपटांसाठी पुरस्कार मिळालेत?**



चांदणी बारमध्ये तब्बू

— १९८६चा देव आनंदचा *हम नौजवान* तब्बूची भूमिका असलेला पहिला चित्रपट. *माचिस* व *चांदणी बार*साठी तिला सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्याचबरोबर स्क्रीन पुरस्कारदेखील.

निरंजन दाभाडे, इचलकरंजी.

□ ***मिलन* या नावाचे किती चित्रपट निघाले? नायक-नायिका व दिग्दर्शक कोण?**

— *मिलन* या नावाचे चार चित्रपट निघाले. १९४६ला पहिला. नायक दिलीपकुमार, नायिका मीरा मिश्रा, रंजना, दिग्दर्शक नितीन बोस. १९५८ला दुसरा. नायक-नायिका अजित-नलिनी जयवंत, दिग्दर्शक केदार कपूर. १९६७ला तिसरा. नायक सुनील दत्त, नायिका नूतन-जमुना, दिग्दर्शक ए. सुब्बाराव. १९९४ला चौथा. नायक-नायिका जॅकी श्रॉफ-मनीषा कोईराला, दिग्दर्शक महेश भट्ट.

संदेश सावे, ओझर.

□ **विद्या सिन्हाने नायिकेची भूमिका केलेले चित्रपट कोणते? नायक कोण?**

— *राजा काका*(किरणकुमार), *रजनीगंधा* (अमोल पालेकर), *मेरा जीवन*(दुष्यंत), *चालू मेरा नाम*(विनोद मेहरा), *इन्कार*(विनोद खन्ना), *कर्म*(राजेश खन्ना), *किताब* (उत्तमकुमार), *ममता*(परीक्षित साहनी), *अतिथी*(शत्रुघ्न सिन्हा), *मुकद्दर*(परीक्षित साहनी), *पती, पत्नी और वो*(संजीवकुमार), *आत्माराम*(शत्रुघ्न सिन्हा), *त्यागपत्र*(प्रताप शर्मा), *सबूत*(नवीन निश्चल), *स्वयंवर*(शशी कपूर), *जोश* (अमजद खान), *नई इमारत*(परीक्षित साहनी), *राखी और चिंगारी*(विनोद मेहरा), *कैदी*(शत्रुघ्न सिन्हा), *कृष्णा कृष्णा* (विश्वजीत) या चित्रपटात विद्या सिन्हाने नायिकेची भूमिका केली.

प्रवीण संख्ये, अहमदनगर.

□ **'चले थे साथ मिल के चलेंगे साथ मिलकर...' व 'ओ जानेवाले बालमा लौट के आ, लौट के आ...' ही दोन गाणी कोणत्या चित्रपटातील? नायक-नायिका कोण?**

— पहिलं गाणं *हसीना मान जायेगी* या चित्रपटातील. नायक-नायिका शशी कपूर-बबिता. दुसरं गाणं *रतन*मधील. नायक-नायिका करण दीवाण-स्वर्णलता.